!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे
शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०८ ०४/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## भुमिगत गटार योजना आणि समांतर जलवाहिनीच्या निधीचा गांभीर्याने विचार करु

### केंद्रिय शहर विकास मंत्री व्यंकय्या नायडू यांचे खासदार चंद्रकांत खैरे यांना आश्वासन

## खासदार चंद्रकांत खैरे यांचे केंद्रिय शहर विकास मंत्री यांना निवेदन

**दिल्ली ( ता.०४ ) :** युआयडीएसएसएमटी अंतर्गत भुमिगत गटार योजनेचा दुसरा हप्ताचा निधी मिळावा व समांतर जलवाहिनीचा केंद्राकडील निधी मिळावा यासाठीचे निवेदन खासदार चंद्रकांत खैरे यांनी केंद्रिय शहर विकास मंत्री व्यंकय्या नायडू यांना दिले. निवेदनावर गांभीर्याने विचार करुन सकारात्मक पाऊले उचलु असे आश्वासन केंद्रियमंत्री व्यंकय्या नायडू यांनी खासदार चंद्रकांत खैरे यांना दिले.

अमृत योजनेमुळे भुमिगत गटार योजनेच्या दुसऱ्या हप्तावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे चित्र होते. त्यामुळे योजनेचे काम मंदावल्याचे लक्षात येताच शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी १६ नोव्हेंबर रोजी बैठक घेतली होती. त्या संदर्भात त्यांनी १९ नोव्हेबर रोजी दिल्ली येथे शहर विकास मंत्रालयाच्या सचिव आणि अप्पर सचिवांसोबत बैठक घेतली होती. युटीलायजेशन सर्टिफिकेट मिळाल्यानंतर दुसऱ्या हप्ताच्या निधी देण्यात येणार असल्याचे शहर विकास मंत्रालयाच्या सचिव मधुसूदन प्रसाद यांनी सांगितले होते.

भुमिगत गटार योजना व समांतर जलवाहिनी संदर्भात खासदार चंद्रकांत खैरे यांनी निवेदन सादर केले आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहर विकासासाठी भुमिगत गटार योजना व समांतर जलवाहिनी या योजना पूर्ण होणे अत्यंत गरजेचे असुन निधी अभावी योजना रखडू नये व योजनांचा कामांना गती मिळावी यासाठी आपण प्रयत्न करावे अशी विनंती ही निवेदनात करण्यात आली आहे.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन/ गणेश वाघ

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525